# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

## Date – 07 October 2023

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी औरंगाबाद

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ ऑक्टोबर २०२३ सकाळी ७.१० मि.

****

- शासकीय रुग्णालयांमध्ये कोणतीही पदं रिक्त राहता कामा नये–मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश
- कुणबी–मराठा जात प्रमाणपत्रासंदर्भात गठित समितीचा ११ तारखेपासून छत्रपती संभाजीनगर विभागाचा दौरा
- दुधाळ जनावरांसाठी राज्यात प्रायोगिक तत्वावर सहा भृण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना

आणि

- आशियाई क्रीडा स्पर्धेत तीरंदाजीत ज्योती सुरेखाचा सुवर्णवेध;हॉकीतही जपानला हरवत सुवर्णपदक

****

शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि सहायक कर्मचाऱ्यांची कोणतीही पदं रिक्त राहता कामा नये, असे सक्त निर्देश, मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. दोन शासकीय रुग्णालयांमध्ये नुकत्याच मोठ्या संख्येनं झालेल्या रुग्णांच्या मृत्यूंची स्वतःहून दखल घेत, न्यायालयानं सरकारला नोटीस बजावल्यानंतर, काल याप्रकरणी सुनावणी झाली. महाराष्ट्र वैद्यकीय साहित्य खरेदी प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती, दोन आठवड्यांच्या आत करण्याचे निर्देशही, न्यायालयानं सरकारला दिले आहेत. सार्वजनिक आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी सरकारकडे काय योजना आहे, अशी विचारणा न्यायालयाने केली आहे. या प्रकरणी पुढची सुनावणी ३० ऑक्टोबरला होणार आहे.

****

मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहीत करण्यासाठी गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष, निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे आणि अन्य समिती सदस्य, येत्या ११ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर या कालावधीत, छत्रपती संभाजीनगर विभागाचा जिल्हानिहाय दौरा करणार आहेत. समितीची पहिली बैठक छत्रपती संभाजीनगर इथं ११ ऑक्टोबरला होईल. जालना इथं १२ ऑक्टोबर, परभणी १६, हिंगोली १७, नांदेड १८, लातूर २१, धाराशिव २२ तर बीड इथं २३ ऑक्टोबरला समितीची बैठक होणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथं विभागीय आयुक्त कार्यालयात तर इतर ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयात निर्धारित दिवशी सकाळी ११ वाजता ही बैठक होईल. नागरिकांनी त्यांच्याकडील पुरावे तसंच राष्ट्रीय दस्तावेज या समितीला उपलब्ध करुन देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कुठलाही वाद नसून, शरद पवार हेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचा दावा, शरद पवार यांच्या गटानं केंद्रीय निवडणूक आयोगासमोरच्या सुनावणीत केला. याप्रकरणी पुढची सुनावणी सोमवारी होणार असून यावेळी अजित पवार गटाचं म्हणणं ऐकून घेतलं जाईल.

****

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या १६ आमदारांच्या पात्रतेच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात येत्या तीन नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. विधानसभा अध्यक्ष अपात्रतेच्या याचिकेवर निर्णय घेण्यात वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करत उद्धव ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

****

दुधाळ जनावरांसाठी राज्यात प्रायोगिक तत्वावर सहा भृण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आहे, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर सह प्रत्येक महसुल विभागात या प्रयोगशाळेच्या माध्यमातून फिरत्या वाहनाद्वारे शेतकऱ्यांच्या घरांपर्यंत ही सेवा पोहचणार आहे.

****

शेतकऱ्यांना दर्जेदार गुणवत्तापूर्ण बी-बियाणे, खते, कीटकनाशके उपलब्ध करून देण्याची जबाबदारी उत्पादक कंपनी आणि कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. पंढरपूर इथं राज्यस्तरीय कृषी निविष्ठा विक्रेते मेळाव्यात ते काल बोलत होते. खते, बियाणे, कीटकनाशकांमुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालं तर कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचा, काल केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवत कराड तसंच सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या उपस्थितीत एका बैठकीत आढावा घेण्यात आला. औषधं पुरवठा, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपलब्धता, आदी विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

****

नांदेड इथल्या शासकिय रुग्णालयात चार ऑक्टोबर ते पाच ऑक्टोबर या २४ तासाच्या कालावधीत ११ जणांचा मृत्यू झाला तर १३४ रुग्ण बरे होऊन घरी गेले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गणेश मनुरकर यांनी ही महिती दिली.

****

दरम्यान, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी या रुग्णालयासंदर्भात बोलताना, आरोग्य सेवेत सुधारणा करून रुग्णांची गैरसोय कशी दूर करता येईल, याकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे. काँग्रेसचे आमदार मोहन हंबर्डे यांनी विधीमंडळाच्या गेल्या हिवाळी अधिवेशनात या रुग्णालयाच्या असुविधांबाबत सभागृहामध्ये सविस्तर माहिती दिली होती, याकडे चव्हाण यांनी लक्ष वेधलं.

****

लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातल्या आरोग्य सुविधेचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी काल आढावा घेतला. रुग्णालयातल्या आवश्यक सुविधा, उपलब्ध औषध साठ्याची त्यांनी माहिती घेतली, तसंच स्वच्छतागृहांची पाहणी केली.

****

चीन मध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं एकशे दोन पदकं निश्चित केली आहेत. यापैकी २३ सुवर्ण, ३४ रौप्य तर ४० कांस्य पदकांसह एकूण ९७

पदकं भारतीय खेळाडूंनी मिळवली आहेत, आज सकाळी ज्योती सुरेखा हिने तीरंदाजीच्या कंपाउंड प्रकारात सुवर्ण पदक तर आदिती गोपीचंद हिने कांस्य पदक पटकावलं. ज्योतीचं हे या स्पर्धेतलं तिसरं सुवर्णपदक आहे.

याशिवाय कबड्डीत दोन, तर क्रिकेट, तीरंदाजी आणि बॅडमिंटनमध्ये प्रत्येकी एक पदक निश्चित झालेलं आहे. भारताची आशियायी क्रीडा स्पर्धेतली ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

*''यास्पर्धेत भारताने काल एक सुवर्ण, दोन रौप्य तर सहा कांस्य पदकं पटकावली. पुरुष हॉकी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघानं जपानच्या संघाचा पाच एकने पराभव करत सुवर्णपदक जिंकलं.*

*तीरंदाजीत पुरुष गटाला रिकर्व्ह प्रकारात रौप्यपदक मिळालं, भारतीय ब्रिज संघानेही रौप्यपदक पटकावलं.*

*तिरंदाजीत महिलांच्या संघानं रिकर्व्ह प्रकारात कांस्य पदक जिंकलं. बॅडमिंटनमध्ये एच एस प्रणॉय, फ्रीस्टाइल कुस्तीमध्ये पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात अमन, महिलांच्या ७६ किलो वजनी गटात किरण आणि महिलांच्या ६२ किलो वजनी गटात सोनमने कांस्यपदक पटकावलं. सेपॅक टॅकरॉ अर्थात किक व्हॉलीबॉल स्पर्धेत भारतीय महिला संघाला कांस्यपदक मिळालं.*

*पुरुषांच्या कबड्डीच्या भारताने पाकिस्तानला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. तर क्रिकेट मध्ये भारतीय पुरुष संघाने बांगलादेश चा नऊ गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.''*

****

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात पाकिस्ताननं नेदरलँड्सचा ८१ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानचा संघ २८६ धावांवर सर्वबाद झाला, प्रत्युत्तरादाखल मैदानात उतरलेला नेदरलँड्सचा संघ ४१व्या षटकात २०५ धावांवर सर्वबाद झाला. या स्पर्धेत भारताचा पहिला सामना उद्या चेन्नई इथं ऑस्ट्रेलियासोबत होणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवापूर्वीच्या मंचकी निद्रेला कालपासून प्रारंभ झाला. येत्या १५ तारखेला

घटस्थापनेला देवी पुन्हा सिंहासनारूढ होऊन शारदीय नवरात्रोत्सवाला आरंभ होणार आहे.

****

मेरी माटी मेरा देश अभियानाअंतर्गत काल सिंधुदुर्गनगरी इथं अमृत कलश यात्रा काढण्यात आली. जिल्ह्यातल्या सर्व आठही नागरी भागातल्या मातीने भरलेल्या अमृत कलशांचं सिंधुदुर्ग नगरी इथं आगमन झाल्यानंतर जिल्हाधिकारी किशोर तावडे यांच्या उपस्थितीत सर्व कलशांतील माती जिल्हास्तरीय कलशात एकत्रित करण्यात आली. यावेळी उपस्थितांना पंचप्रण शपथ देण्यात आली.

****

आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त धुळे शहरात अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत काल प्रभातफेरी आणि तृणधान्य मेळावा घेण्यात आला. यावेळी शाळेय विद्यार्थी, शिक्षकांनी मोठ्या संख्येनं सहभाग नोंदवला होता.

****

वर्धा जिल्ह्यातून भारतीय जनता पक्षाच्यावतीनं काढण्यात आलेली इतर मागास वर्ग-ओबीसी जागर यात्रा आज गोंदिया इथं पोहोचली. याठिकाणी बाईक रॅली काढून यात्रेचं स्वागत करण्यात आलं. त्यानंतर ओबीसी जागर सभा घेण्यात आली.

****

टोमॅटो तसंच कांद्याचे भाव वाढलेले असताना त्यांच्यावर नियंत्रण आणणाऱ्या केंद्र सरकारनं, या दोन्ही शेतमालाचे भाव आता कमी झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी काय उपाययोजना केल्या, असा प्रश्न, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विचारला आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण तालुक्यातल्या लोहगाव इथं, होऊ द्या चर्चा या कार्यक्रमात ते बोलत होते.

****

राज्यात शासनाने स्वीकारलेल्या कंत्राटी भरती विरोधात सुशिक्षित बेरोजगारांनी काल नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. खाजगीकरण, कंत्राटीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने काढलेल्या या मोर्चात विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

****